# मुलांसाठी बाइबल
## प्रस्तुत



# राजकुमार मेंढपाळ बनतो

लेखक: Edward Hughes
अनुवादक: Rev. Shilas Gavit
रेखाचित्रकार: M. Maillot; Lazarus
रूपान्तरकार: E. Frischbutter; Sarah S.

60 गोष्टींतील 10 (पहिली)

**www.M1914.org**

***Bible for Children,*** *PO Box 3, Winnipeg, MB R3C 2G1 Canada*

परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्टविकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.

मराठी

Marathi



एके दिवशी मोशेने एक मिसरी मनुष्य एका इब्री गुलामाला मारत आहे असे पाहिले.

1



मोशे जरी राजकुमाराप्रमाणे फारोच्या महालात लहानाचा मोठा झाला होता, व शिक्षण मिळाले होते तरी तो एक इब्री होता. मोशेने त्या गुलामाला मदत केली.

2


आजूबाजूला मला कोणी पाहात तर नाही ना, याची मोशेने खात्री करुन
घेतली, आणि मोशेने त्या गुलामाच्या क्रूर मालकावर हल्ला केला. त्यांच्या या
झगडण्यात मोशेने त्या मिसरी मनुष्याला मारुन टाकले. त्याने ताबडतोब त्या
मनुष्याचे प्रेत पुरुन टाकले.
3
दुसऱ्या दिवशी दोन इब्री माणसांना एकमेकांसंगती भांडतांना मोशेने पाहिले.
त्याने त्यांना थांबविण्याचा प्रयत्न केला. त्यांच्यातील एक मोशेला म्हणाला,
"तूं त्या मिसऱ्याला जिवे मारले तसे मला देखिल मारु पाहतोस काय?"
4
तेंव्हा मोशे घाबरला. कालच्या घटनेची सर्वांना माहिती झाली होती. फारोला
देखिल माहित झाले होते. मोशेला तेथून पळून जावे लागले. तो मिद्यान
नावाच्या देशात पळून गेला.
5
जाता-जाता मोशे एका विहिरीजवळ बसला. तेथील याजकाच्या सात मुली
आपल्या बापाच्या शेरडांमेंढरांस पाजण्याकरिता पाणी डोणींत भरत होत्या.
6
इतर मेंढपाळ त्यांना तेथून एकाबाजूला हाकलून देण्याचा प्रयत्न करित होते.
तेंव्हा मोशेने उठून त्या मुलींची मदत केली आणि त्यांचे संरक्षण केले.
7
त्या आपला बाप रगुवेल
याच्याकडे आल्या तेंव्हा
तो म्हणाला, "आज
तुम्ही लवकर कशा
आल्या?" कशा आल्या
हे जेंव्हा त्या मुलिंनी
स्पष्ट करुन सांगितले
तेंव्हा तो म्हणाला,
"त्या मनुष्याला
येथे घेऊन या."
8


माशे रगुवेल संगती
राहिला, याला इथ्रो असे
देखिल म्हणत. नंतर,
मोशेने रगुवेलच्या मोठ्या
मुलीशी लग्न केले.
9
मिसरांत, फारो राजा मरण पावला. देवाचे
लोक, इब्री लोक अजून गुलामच होते.
त्यांच्या दुःखात ते विव्हळत होते! देवाने
मदत करावी म्हणून त्यांनी प्रार्थना केली!
देवाने त्यांच्या
प्रार्थना ऐकल्या.
10
इब्री लोकांना गुलामगिरीतून सोडविण्यासाठी मोशेचा
उपयोग करावा अशी देवाने योजना आखली, या
योजनेविषयी मोशेला माहिती नव्हती. मोशे मिसर
देश सोडून आल्यापासून आता ४० वर्षे झाले होते.
तो रगुवेलच्या कळपांचा मेंढपाळ बनला होता.
परंतू मिसरातील त्याच्या स्वतःच्या लोकांची
त्याला खूप आठवण येत असावी.
11
एके दिवशी त्याच्याजवळ जळत असलेल्या
झुडपाकडे त्याचे लक्ष गेले. परंतु अग्निने झुडप
मात्र भस्म होत नव्हते. हे असे का याविषयी
शोध लावण्याचे मोशेने ठरविले.
12
मोशे त्या झुडपाकडे जात असतांना देवाने त्या झुडपातून मोशेला हाक मारली.
"मोशे , मोशे!" तेव्हा तो म्हणाला, "काय आज्ञा?" देव त्यास म्हणाला, "इकडे
फार जवळ येऊ नको; तूं आपल्या पायांतले जोडे काढ, कारण ज्या जागीं तू
उभा आहेस ती भूमि पवित्र आहे."
13
परमेश्वर देव आणखी म्हणाला, "माझ्या लोकांना मिसरांतून बाहेर
काढून आणण्यासाठी मी तुला फारोकडे पाठविन." परंतु मोशे
जाण्यास घाबरत होता.
14

तेंव्हा देवाने मोशेला त्याचे महान सामर्थ्य दाखवले. त्याने मोशेच्या हातातील काठीचा साप केला.



15

मोशेने त्या सापाच्या शेपटीला धरुन जेंव्हा उचलले तेंव्हा पुन्हा सापाची काठी बनली. देवाने दुसरे एक चिन्ह दिले.



16

देवाने मोशेला सांगितले की, "तुझा हात तुझ्या छातीवर ठेव." मोशेने तसे केले. तेंव्हा त्याचा हात कोडाने पांढरा झाला.



17

त्याने पुन्हा तसेच केले तेंव्हा त्याचा हात बरा झाला.



18

मोशे अजून आक्षेप घेत होता. तो म्हणाला, "मला चांगले बोलता येत नाही." देवाला आता राग आला. तो म्हणाला, "तुझा भाऊ अहरोन याचा मी उपयोग करीन, जे काही बोलायचे ते तू त्याला सांग."



19

मोशे इथ्रोकडे परतला, त्याने त्याचे सामान घेतले आणि तो मिसर देशात जाण्यास निघाला.



20













राजकुमार मेंढपाळ बनतो

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

निर्गम २–५

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०



ईश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मृत्यू आहे.

ईश्वर आमच्यावर इतके प्रेम करतो की क्रॉसवर मरण्यासाठी आणि आमची शिक्षा भोगण्यासाठी त्याने आपल्या पुत्राला येशूला पाठविले. येशू पुन्हा जिवंत झाला आणि स्वर्गात परत गेला! आता ईश्वर आमच्या पापांसाठी क्षमा करू शकतो.

जर तुम्ही तुमच्या पापांपासून मुक्ती मिळवू इच्छिता, तर ईश्वराला हे सांगा: प्रिय ईश्वरा, येशू माझ्यासाठी मेला आणि आता पुन्हा जगतो आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांसाठी मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल आणि नंतर मी कायम तुझ्याबरोबर राहीन. तुझे मूल होऊन तुझ्यासाठी जगण्यास मला मदत कर. आमेन. जॉन 3:16

बाइबल वाचा आणि ईश्वराशी रोज बोला!